बृहन्मुंबई महानगरपालिका
संकलित मूल्यमापन १ - २०१८-१९
इयत्ता : आठवी, विषय - मराठी (लेखी)

विद्यार्थ्याचे नाव : हजेरी क्रमांक
शाळेचे नाव : तुकडी :

| | लेखी | | | | | | | | | तोंडी | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५ | ५ | ५ | ०५ | ०५ | ६० |

प्र.१ ला शब्द ऐकून लिहा. (5)

१) ______ २) ______
३) ______ ४) ______
५) ______ ६) ______
७) ______ ८) ______
९) ______ १०) ______

प्र.२ रा खालील उतारा मनात वाच आणि योग्य पर्याय लिहा.

उतारा :

इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे नागपूर–दादर एक्सप्रेस इगतपुरी स्टेशनवर तीन तास थांबून राहिली. गाडीतले प्रवासी कंटाळून प्लॅटफॉर्मवर येरझारा घालू लागते. कुणी बुकस्टॉलवरची वर्तमानपत्रं घेऊन वाचत जागेवर आडवे झाले. दोन प्रवासी मात्र एका दगडी बाकावर जाऊन बसले आणि त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. सुमारे एक तासभर गप्पा मारल्यानंतर ते दोघेही कंटाळले. त्यांनी चहा मागवला. चहा घेतल्यानंतर त्यांच्या गप्पा पुन्हा रंगल्या. ते एवढ्या मोठ्यानं हसत आणि बोलत होते, की त्यांचा शब्द नि शब्द दूरवर ऐकू जात होता. त्या दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा होता आणि दुसरा तरुण!

म्हातारा त्या तरुणाला म्हणाला, ''राजा, तुझं इंग्लंडला जाणं पक्कं झालं ना ?''

''असं काय काका मला विचारता ? मी पासपोर्ट मिळवला, व्हिसा काढला, नवीन कपडे टेलरने परवाच शिवून दिले. चार सूट आणि इतर नेहमीचे कपडे घेतले आहेत. तुम्ही दिलेले घड्याळ, तर मी आताच वापरायला काढलं आहे.''

''राजा, ते घड्याळ भारी किमतीचं आहे. दहा हजार मोजलेत. पिटस्बर्गला ते घड्याळ खास तुझ्यासाठी घेतलं होतं. विमान प्रवासासाठी तुला पन्नास हजार रुपये पुरतील ना ? मुंबईला गेल्यानंतर मी तत्काळ तेवढी रक्कम तुला देईन ! पण बेटा सांभाळून जायचं बरं का !''

अ) उताऱ्यातील योग्य विधानाचा पर्याय लिहा. (2)
१) लेखकाची नागपूर-दादर पॅसेंजर गाडी होती.
२) म्हातारा व तरुण करोडपती होते.
३) तरुण वकिली करायला परदेशात जात होता.
४) दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा आणि दुसरा तरुण!

ब) 'सुधारणा' या शब्दाला उताऱ्यात आलेला विरुद्धार्थी (2)

शब्द ☐
१) बिघडलेला
२) बिघाड
३) नादुरूस्त
४) पुरातन

क तरुणाने इंग्लंडला जाण्यासाठी खालीलपैकी कोणती वस्तू घेतली नाही. ☐ (१)
१) व्हिसा
२) घड्याळ
३) पासपोर्ट
४) कॅमेरा

प्र.३रा खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांच्या उत्तराचा पर्याय लिही.

असा रंगारी श्रावण रंग उधळीत येतो
सृष्टीचा गा चित्रकार हिर्वा देखावा रेखितो
कलावंत हा साजिरा काय त्याची कलागत
जागोजागी चित्रांचीच त्यानं मांडली पंगत
नाचे दरी डोंगरात झिम्मा खेळतो नदीशी
रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी
वेण्या गुंफितो वेलींच्या वेली लाजल्या लाजल्या
पाना-फुलांचे पातळ थेंबाथेंबांनी सजल्या

अ रंगाचे काम करणारा ☐ (१)

१) सुतार
२) शिल्पकार
३) रंगारी
४) कलाकार

ब कवितेतील यमक जुळणारी शब्दांची जोडी ☐ (२)
१) दिव्य - भव्य
२) कलागत - पंगत
३) आखितो - रेखितो
४) येतो - खातो

Scanned by CamScanner

क ‘रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी’ ह्या ओळीचा अर्थ - ☐ ②

१) रंग उधळून हिरवा देखावा रेखाटतो.
२) जागोजागी चित्रांची पंगत मांडतो.
३) उन्हात पावसाचे घर बांधतो.
४) झाडांशी रिमझिम सरींचे गाणे बोलतो.

प्र.४था खालील उतारा मनात वाच आणि योग्य पर्याय लिही.

माणसाच्या गरजा दोन प्रकारच्या असतात. एक आर्थिक व दुसरी सामाजिक. पैसा, सुख, सत्ता, प्रतिष्ठा वगैरे गोष्टी पहिल्या प्रकारात येतात. दुसऱ्या प्रकारात सचोटी, ज्ञान, न्याय, खेळीमेळीने वागणे, सहानुभूती, दुसऱ्याचे नीट समजून घेणे, निःपक्षपातीपणा, सेवा इत्यादी गोष्टी येतात. काही उत्कृष्ट वस्तू पैशाने विकत घेता येतात; पण मनाचे व हृदयाचे समाधान, सुख व शांती, सद्भाव व सदिच्छा या गोष्टी बाजारात मिळत नाहीत. धनाच्या राशी ओतल्या, तरी त्या लाभत नाहीत आणि याच गोष्टी सर्वांना हव्या असतात.

आपण आधी माणूस आहोत, म्हणूनच सौंदर्याचे प्रेम, मनाचा विकास वगैरे गोष्टी आपल्याला आकर्षित करत असतात; म्हणून आपण समाधान व मनाचे स्वातंत्र्य यालाच महत्त्व दिले पाहिजे.

अ माणसाच्या गरजा - ☐ ①

१) फक्त सामाजिक
२) आर्थिक व सामाजिक
३) फक्त आर्थिक
४) फक्त भौतिक

ब पैशाच्या मोबदल्यात न मिळविता येणाऱ्या गोष्टी ☐ ②

१) जमिन - जुमला
२) गाडी - बंगला
३) सत्ता - प्रतिष्ठा
४) सद्भाव - सदिच्छा

क सहसंबंध ओळखा - सुख - ☐ ②

१) दुरावणे ३) ओलावणे
२) दुखावणे ४) सुखावणे

Scanned by CamScanner

प्र.५ वा खालील उतारा मनात वाच आणि योग्य पर्याय लिही.

सुरेल सुरांनी जागीच पाच तास बांधून टाकलेले प्रेक्षक हळूहळू भानावर आले. एखादी मोहिनी संपावी तशी त्यांची मंत्रमुग्धता त्यांना हळूहळू सोडून जाऊ लागली. शतमुखांनी अण्णासाहेबांविषयी धन्योद्‌धार रघुनाथरावांच्या आजूबाजूला निघत होते. मंथरेच्या आणि कैकेयीच्या गाण्यांची जो तो स्तुती करीत थिएटराबाहेर पडताना जिने उतरत होता. गर्दीच्या लोंढ्याबरोबर रघुनाथराव पुढे पुढे सरकत होते. अभिनयाचे अजब, थरथरते, काळजाला हात घालणारे जग त्यांनी आयुष्यात प्रथमच पाहिले होते. कृष्णाजी जोशींची 'शाहूनगरवासी' कंपनी विसनगरला कधी आलेलीच नव्हती आणि नाटक म्हणजे काय असते, याचे रघुनाथरावांचे गूढ उकललेलेच नव्हते. माणसांनी घेतलेली पौराणिक सोंगे किती जादू करू शकतात याची त्यांना आतापर्यंत यामुळे कल्पनादेखील नव्हती. दशरथाची साधी गोष्ट काही त्यांना नवीन नव्हती. पण ही नुसती गोष्ट नव्हती. ती समोर घडत असताना माणसे रडत होती, उसासे टाकीत होती आणि या सगळ्यांतून निर्माण होणारा आनंद त्यांना सारखा हवाहवासा वाटत होता. आनंदाच्या इतक्या विस्तीर्ण आणि खोल डोहात रघुनाथराव कधीच डुंबलेले नव्हते. गेल्या पाच तासांतला प्रत्येक क्षण ते रसरशीतपणे जगले होते. या अनुभवाने त्यांच्या वृत्ती अगदी थरथरून आलेल्या फुलासारख्या कोमल झाल्या होत्या.

पाहता पाहता आसपासची माणसे पांगली. अनेक घोडागाड्या सुटल्या. घोड्यांच्या टापा दूरदूर गेल्या, तरी थिएटरच्या दरवाजापाशी रघुनाथराव खिळल्यासारखे उभे होते.

अ) रघुनाथराव या ठिकाणी बसले होते. ☐ (१)

१) नाट्यगृहात
२) चित्रपटगृहात
३) घरात
४) शाहूनगरात

ब) शुद्ध शब्द ओळखा. ☐ (२)

१) मंत्रमुगधता
२) मंत्रमुग्धता
३) मंत्रमूग्धता
४) मंत्रमुघ्गता

क) दशरथाची गोष्ट पाहताना प्रेक्षकांची होणारी भावावस्था. ☐ (२)

१) दुःखी
२) आनंदी
३) क्रोधी
४) उत्साही

Scanned by CamScanner

प्र. ६वा खालील प्रश्न वाच व योग्य पर्याय लिही.

अ 'गणेश' या शब्दाचा संधी विग्रह - ☐ (१)

१) गण + ईश
२) गण + इश
३) गन + ईश
४) गणः + ईश

ब 'पासपोर्ट' या शब्दास पर्यायी मराठी शब्द - ☐ (१)

१) पुस्तिका
२) संदेशपत्र
३) पारपत्र
४) तारपत्र

क क्रियापदाचे योग्य रूप - ☐ (१)

आम्ही क्रिकेट ——.(खेळणे)

१) खेळलो
२) खेळणार
३) खेळतो
४) खेळेल

ड अधोरेखीत शब्दांसाठी योग्य शब्दसमूह - ☐ (१)

वाक्य- वाघाची डरकाळी ऐकताच सर्व प्राणी <u>पळून गेले.</u>

१) गढून जाणे
२) वर्दी देणे
३) पाठ थोपाटणे
४) धूम ठोकणे

इ प्रयोग ओळखा - ☐ (१)

वाक्य- राधिका धाडसी कॅप्टन होती.

१) कर्मणी प्रयोग
२) कर्तरी प्रयोग
३) भावे प्रयोग
४) केवल प्रयोगी

६

प विशेषण- विशेष्य याची अचूक जोडी- [ ] ①

१) मुलायम - स्पर्श

२) भरभरीत - आवाज

३) कुरेबाज - झांज

४) मडिवाळ - तान

फ तुमचे लिखाण सरस होईल. काळ ओळखा- [ ] ①

१) वर्तमानकाळ

२) भविष्यकाळ

३) भूतकाळ

४) चालू वर्तमानकाळ

ब पुढील नामाचे पूर्ण रूप- [ ] ①

वादळे (चा)

१) वादळांना

२) वादळांचे

३) वादळांसाठी

४) वादळांचा

भ सर म्हणाले, "शिस्त पाळा." या वाक्यातील विरामचिन्हांचा प्रकार ओळखा. [ ] ①

१) प्रश्नचिन्ह

२) दुहेरी अवतरण चिन्ह

३) एकेरी अवतरण चिन्ह

४) उद्गारचिन्ह

न गटात न बसणारा शब्द- [ ] ①

१) सुमन

२) सुविचार

३) सुरस

४) सूर्य

Scanned by CamScanner

प्र.७वा तुझ्या शाळेत नुकताच वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचा अहवाल तुझ्या शब्दांत लिही. (५)

Scanned by CamScanner

प्र.८वा तुझ्या शाळेतील बालकोत्सव कार्यक्रमाला प्रमुख आतिथी म्हणून उपास्थित राहण्यासाठी धाडसी कॅप्टन राधिका मेनन यांना पत्र लिही.

Scanned by CamScanner

प्र.९वा स्वच्छता अभियानाविषयी तुझे मत लिही.

Scanned by CamScanner

बृहन्मुंबई महानगरपालिका

संकलित मूल्यमापन १ - २०१८-१९

इयत्ता - आठवी विषय - मराठी (लेखी)

उत्तरसूची

| | |
|---|---|
| प्र. १ला | शब्द<br>१) भारतमाता २) विमान<br>३) इगतपुरी ४) माहिती<br>५) इंजीन ६) स्टेशन<br>७) न्याय ८) प्रकाश<br>९) उत्कर्ष १०) कृषी |
| प्र. २रा (अ) | ४) दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा आणि दुसरा तरुण! |
| (ब) | २) बिघाड |
| (क) | ४) कॅमेरा |
| प्र. ३रा (अ) | ३) रंगारी |
| (ब) | २) कलागत - पंगत |
| (क) | ४) झाडांशी रिमझिम सरींचे गाणे बोलतो. |
| प्र. ४था (अ) | २) आर्थिक व सामाजिक |
| (ब) | ४) सद्भाव - सदिच्छा |
| (क) | ४) सुखावणे |
| प्र. ५वा (अ) | १) नाट्यगृहात |
| (ब) | ४) मंत्रमुग्धता |
| (क) | २) आनंदी |
| प्र. ६वा (अ) | १) गण + ईश |
| (ब) | ३) पारपत्र |
| (क) | ३) खेळतो |
| (ड) | ४) धूम ठोकणे |
| (इ) | २) कर्तरी प्रयोग |

Scanned by CamScanner

(प) १) मुलायम - स्पर्श
(फ) २) भविष्यकाळ
(ब) ४) वादळांचा
(भ) २) दुहेरी अवतरणचिन्ह
(म) ४) सूर्य

प्रश्न क्र. ७, प्रश्न क्र. ८ व प्रश्न क्र. ९
लेखन नियमानुसार गुण देणे.

Scanned by CamScanner